# जागतिकीकरण आणि आंतरराष्ट्रीय कायदा

ॲड. (डॉ.) संतोष अ. शहा, कोल्हापूर

आंतरराष्ट्रीय कायद्याच्या माहीतीबावत आपल्याकडे बरीचशी उदासिनता आढळून येते. परंतू ही उदासीनता झटकून देऊन आंतरराष्ट्रीय कायद्यावरती आपण प्रभुत्व न मिळविलेस जागतिकीकरणाच्या शर्यतीमध्ये खूप मागे पडू शकू. आज आंतरराष्ट्रीय कायदा व त्यामध्ये जे घडते त्याचा परिणाम जागतीकीकरणामुळे व्यापार, गुन्हेगारी, दहशतवाद, पर्यावरण, मानवी हक्क इत्यादी अनेकविध क्षेत्रामध्ये राष्ट्रांवरती व त्याच्या नागरीकांवरच होऊ लागलेने आंतरराष्ट्रीय कायद्याचे महत्व जाणून त्याचा चांगला अभ्यास असणे अत्यावश्यक झाले आहे. सदरची बाब भारतासारख्या तिस-या जगातील देश जे असे मांडतात की जगातील आंतरराष्ट्रीय कायदा हा मुख्यत्वेकरून पाश्चात्य देशांनी आणलेला आहे, त्यांनी तरी या कायद्याचा अभ्यास करून तो आत्मसात करून त्याचा देशहितासाठी वापर करण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करावयास हवा.

लोकशाहीत राष्ट्रीय कायद्याचा विचार करता हे कायदे लोकांनी निवडून दिलेल्या कायदे मंडळांनी करावेत, त्याची अंमलवजावणी कार्यकारी मंडळाने करावी व कोणत्याही प्रकारचे वाद हे न्यायमंडळाने सोडवावेत अशी सर्वसाधरणपणे रचना दिसते. आंतरराष्ट्रीय कायद्यात मात्र अशी निश्चीत रचना नसून आंतरराष्ट्रीय कायदे हे मुख्यत्वेकरून आंतरराष्ट्रीय रूढी व परंपरा व आंतरराष्ट्रीय करार यातून निर्माण होतो. त्यांच्या अंमलवजावणीसाठी राष्ट्रांना शांततेचे मार्ग ज्यामध्ये एखाद्या राष्ट्राला युनोच्या सुरक्षा मंडळांमार्फत वेगवेगळया मार्गांनी एकटे पाडणे, म्हणजेच आर्थीक, सामाजीक, सांस्कृतीक, राजकीय इत्यादीरित्या एकटे पाडणे, तर कांही वेळा स्वसंरक्षणासाठी किंवा आंतरराष्ट्रीय कायद्याच्या भंगामुळे बळाचा वापर करणे हे मार्ग अवलंबीता येतात. येथेच हे नमूद करणे आवश्यक आहे की हेग येथील आंतरराष्ट्रीय न्यायालय हे जरी आंतरराष्ट्रीय प्रकारचे न्यायमंडळ मानले गेले असले तरी त्यामध्ये फक्त राष्ट्राराष्ट्रामधीलच वाद चालू शकतात. त्यामुळे राष्ट्र व खाजगी व्यक्ती, संस्था, कंपन्या इत्यादीमधील वाद हे प्रादेशीक किंवा राष्ट्रीय न्यायमंडळालाच सोडवावे लागतात.

तसे पाहिले तर राष्ट्रीय कायद्यांच्या बाबतीत निश्चितता असली तरी ते कायदे तयार होण्यामध्ये, त्यांच्या अंमलबजावणीमध्ये व त्याबाबतचे वाद न्यायमंडळामार्फत सोडविण्यामध्ये मर्यादा व दोष असल्याचे लक्षात येते. परंतू त्यामुळे अशा कायद्यांच्या बाबतीत असा राष्ट्रीय कायदा अस्तित्वात आहे किंवा नाही याची क्वचीतच विचारणा केली जाते. मात्र आंतरराष्ट्रीय कायद्याचे वरील स्वरूप पहाता अनेकवेळा असा प्रश्न चर्चीला जातो. याबाबतीत एक बाब लक्षात ठेवणे अगत्याचे आहे की आंतरराष्ट्रीय कायद्याच्या परिणामकारीकतेबाबत किंवा अस्तित्वाबाबत प्रश्न उभे करू पहाणा-या अनेक नागरीकांची मते ही मुख्यत्वेकरून प्रसार माध्यमांनी प्रसिध्द केलेल्या आंतरराष्ट्रीय कायद्याच्या भंगाबाबतच्या बातम्यांवर अवलंबून असतात. वास्तवीक पहाता प्रसार माध्यमे ही आंतरराष्ट्रीय कायद्याचा झालेला भंग प्रसिध्द करतात मात्र बहुतेक राष्ट्रे, नागरीक, उद्योगधंदे, आंतरराष्ट्रीय संस्था इत्यादी आंतरराष्ट्रीय कायद्याचे पालन करीत असता त्याची मात्र प्रसार माध्यमांमार्फत प्रसिध्दी न केलेने त्याची जाणीव आपणास होत नाही. शिवाय राष्ट्रीय कायद्यामध्ये देखील अशाप्रकारची कायदा मोडण्याची उदाहरणे अनेक असली तरी आपण राष्ट्रीय कायदाच अस्तित्वात नाही असे म्हणू शकत नाही. कायद्याचा भंग मग तो राष्ट्रीय असो वा आंतरराष्ट्रीय असो होतच असतो. अगदी पराकोटीच्या युध्दामध्येदेखील राष्ट्रेही आपण घेतलेली बाजू ही कशी बरोबर आहे हे पटविण्यासाठी आंतरराष्ट्रीय कायदा व त्याच्या तत्वाचा नेहमीच आधार घेत असतात.

आज जगातील अनेक प्रश्न केवळ राष्ट्रीय न रहाता आंतरराष्ट्रीय झालेले आहेत व यामुळेच आंतरराष्ट्रीय कायदा हा राष्ट्रीय कायद्याचा भाग झालेला आहे. राष्ट्र ही एक कायद्याने केलेली संकल्पना असून शेवटी जागतीकीकरणामुळे या संकल्पनेपेक्षा एक लहान जग व त्याचा नागरीक ही संकल्पना पुढे येऊ पहात आहे. राष्ट्राराष्ट्रांमधील सीमारेषा आता नाहीशा होत आहेत. आंतरराष्ट्रीय कायद्याचे वाढते महत्व खालील बाबींवरून सहज स्पष्ट होईल.

1) गेल्या वीस वर्षाच्या जगामधील राजकीय घडामोडी पहाता त्यात सोव्हीएत रशियाचे पतन, दुस-या महायुध्दानंतर स्वातंत्र्य मिळालेल्या राष्ट्रांचे विकास व सुबत्तेचे प्रश्न व या बरोबरच विज्ञान व तंत्रज्ञानाने राष्ट्राराष्ट्रांमधील व नागरिकांमधील कमी झालेले अंतर यामुळे अंतरराष्ट्रीय अर्थविषयक

कायद्यांची वेगाने वाढ झालेली दिसते. जागतीक व्यापारातून सुवत्ता मिळविणेचा प्रयत्न सर्व देश करू लागलेले आहेत.

1980 नंतर आंतरराष्ट्रीय अर्थविषयक कायदा ज्यामध्ये मुख्यत्वेकरून आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक कायद्याचा समावेश आहे त्याची झपाटयाने प्रगती झाली. राष्ट्रांमधील आंतरराष्ट्रीय व्यापार विषयक करार व त्याहीपेक्षा महत्वाचे म्हणजे लोकांनीच निर्माण केलेले बहुउद्देशीय संस्थांमार्फतचे उद्योग यामध्ये आंतरराष्ट्रीय कायद्याची प्रचंड प्रगती झाली. आंतरराष्ट्रीय व्यापार हा सर्वदृष्टीने सुकर व्हावा म्हणून "गॅट" ची स्थापना झाली. गॅटची 1986 ते 1994 ची ऊरूग्वेची बैठक ही सर्वात महत्वाची ठरून त्यात 1.10.1995 पासून मार्केश कराराने जागतीक व्यापार संघटना (WTO) ची स्थापना केली. जागतीक व्यापार संघटना ही माल व सेवा यामधील आंतरराष्ट्रीय व्यापाराशी संबंधीत आहे. तसेच त्याचा संबंध बौध्दीक संपत्तीशी देखील आहे. आज खरी संपत्ती ही पारंपारीकरित्या उत्पादन व सेवा यातून निर्माण न होता ती बुध्दीमत्तेतून निर्माण होते याची जगास प्रचीती येऊ लागली आहे.

सध्या देशांदेशांमध्ये जागतीक व्यापार संघटनेमध्ये काय असावे, कसे असावे, काय नसावे याबाबत वेगवेगळया बैठका होत असून प्रत्येक देश आपापल्या संघांमधून याबाबत चर्चा करून त्यातून निर्माण होणारा कायदा हा आपल्या प्रगतीस पोषक असेल याचे प्रयत्न करू लागलेला आहे. यामध्ये सहाजीकच दक्षिणेकडील गरीब राष्ट्रे व उत्तरेकडील श्रीमंत राष्ट्रे यांच्यामध्ये वेगवेगळया मुद्यांवर मतभिन्नता असून ती देवघेव पध्दतीने सोडविण्याचा जागतीक व्यापार संघटनेमार्फत प्रयत्न केला जात आहे. कायदा हा चर्चेमधून निर्माण होणारे एक उत्पादन बनले आहे !

2) अशाप्रकारे आंतरराष्ट्रीय कायद्याची घोडदौड ही आंतरराष्ट्रीय आर्थीक बाबींकडे सुरू असतानाच मागील वर्षी झालेल्या 11 सप्टेंबर रोजीच्या अमेरीकेतील न्यूयार्क शहरामधील वर्ल्ड ट्रेड सेंटरवरील हल्याने आंतरराष्ट्रीय कायद्याची दिशा आता दहशतवादाकडे वळली गेलेली आहे. बहुतेक देश आता दहशतवाद हा केवळ राष्ट्रीय प्रश्न नसून आंतरराष्ट्रीय प्रश्न असलेचे मान्य करून यासाठी राष्ट्रीय स्तरावर व आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील योग्य कायदे करीत आहेत. यामधूनच

नुकतेच आंतरराष्ट्रीय फौजदारी न्यायालयाची स्थापना 1988 च्या रोम कराराने झालेला आहे. अशाप्रकारच्या आंतरराष्ट्रीय फौजदारी न्यायालयाची निर्मीती ही जगात पहिल्यांदाच होत आहे.

3) अगदी अलीकडे अमेरीकेने केलेल्या इराकवरील हल्यामुळे आंतरराष्ट्रीय कायद्यामधील आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेचा प्रश्न सांभाळणे किती अवघड आहे हे लक्षात आलेने आता युध्दे कशी थांवतील याऐवजी युध्दे कशी लढावीत की ज्या अन्वये आवश्यक तितकाच संहार राष्ट्रे घडवतील, कमीतकमी लोकांना त्याचा त्रास होईल, मुख्यत्वेकरून लष्करी लक्ष हीच मुख्य लक्ष रहातील इत्यादी वावींचा आंतरराष्ट्रीय मानवतावादी कायद्यांमधून उदय होत आहे. यास 1949 चें जिनीव्हा परिषद व 1977 चे करार कारणीभूत आहेत. आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस ही संस्था अशा युध्दाची झळ पोहोचलेल्या नागरीकांना ते कोणत्याही देशाचे असतील तरी त्यांना आवश्यक ती मदत पुरवू शकते.

4) देशादेशांमधील करार ज्यांना आंतरराष्ट्रीय कायद्यात "Treaty" असे संवोधिले जाते, हे करार झालेनंतर प्रत्येक देशाने आपल्या कायद्यात योग्य ते वदल करणे आवश्यक ठरते. अर्थातच देशांदेशांमधील होणारे असे करार हे एकतर एखादे सरकार त्याची राजकीय भूमीका म्हणून करू शकतात व शिवाय दुस-या बाजूने प्रत्येक देशातील नागरीकदेखील आपापल्या सरकारांवर त्यांच्या हितासाठी देशांनी योग्य करार करावेत म्हणून नेहमीच दवाव आणत असतात. या सर्वातून आंतरराष्ट्रीय कायद्याची जडणघडण होत असते.

आंतरराष्ट्रीय करार केलेनंतर राष्ट्रांवरती त्यानुसार राष्ट्रीय कायद्यात वदल करणे वंधनकारक झालेले आहे. उदा. भारतातच नुकत्याच झालेले खालील कायद्यातील वदल हे आंतरराष्ट्रीय कायद्यांमुळे झालेले आहेत.

The Competition Act, 2002, The Securitization Act, 2002,The Foreign Exchange Management Act, 2000, The Negotiable Instruments Act, 1882, The Insurance Regulatory and Development Act, The Extradition Act, 1962, The Arbitration and Conciliation Act, 1966,The Chemical Weapons Act, 2000, The Information Technology Act, 2000 इत्यादी

5) जागतीकीकरणामुळे वहुराष्ट्रीय कंपन्या, अशासकीय संस्था (NGOs) यांचा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कायद्यांवरील प्रभाव प्रचंडप्रमाणात वाढलेला आहे. याचीच परिणती म्हणजे मानवी हक्क, पर्यावरण, स्त्रीया, लहान मुले, अर्थविषयक कायदे इत्यादींची वाढ झपाटयाने झालेली दिसते.

6) आंतरराष्ट्रीय कायद्यात काम करत असणारी मंडळी ही दररोज आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेशिवाय इतर अनेक प्रकारचे प्रश्न आंतरराष्ट्रीय कायद्यान्वये सोडवीत असतात, ज्यामध्ये परदेशी नागरीकांचा प्रश्न, नागरीकतेचा प्रश्न, प्रत्यार्पणाचा प्रश्न राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कायद्याच्या अंमलवजावणीचा प्रश्न, आंतरराष्ट्रीय करारांचा अर्थ लावणेच प्रश्न इत्यादींचा समावेश होतो.

7) युरोपमध्ये युरोपीयन राष्ट्रांमधील अर्थविषयक समाजाच्या (European Economic Community) कायद्याने व्यापारातील सहकार्यामधून आता संपूर्ण राजकीय सहकार्य व एकता आणण्याकडे जोरात वाटचाल चालू असलेचे दिसते. युरोपियन न्याय मंडळाकडे आपल्या देशाविरूध्द युरोपियन करारांच्या कायद्याचा भंग झालेस युरोपियन नागरीक दाद मागू शकतो. जगाच्या इतिहासातील हे एक उदाहरण वेगळेच असून ते जगामध्ये सर्व ठिकाणी अनुकरनीय आहे.

8) आंतरराष्ट्रीय कायद्यामध्ये आता असे मानले जाते की आंतरराष्ट्रीय कायद्यांमुळे प्रत्येक व्यक्तीस कांही कधीही न हिरावून घेता येण्यासारखे हक्क आहेत, ज्यामध्ये स्वत:चे राष्ट्र ठरविण्याचा हक्क, साधन सामुग्रीच्या वापर व विल्हेवाट लावण्याचा हक्क, प्रगत होणेचा हक्क, शांतता व सुरक्षिततेचा हक्क आणि त्यांचे सर्व पर्यावरणविषयक हक्क इत्यादींचा समावेश आहे.

वरील सर्व घडामोडीं पहाता आता राष्ट्रांचे संपूर्ण सार्वभौमत्व ही संकल्पना वरीचशी निघून गेल्याचे दिसून येईल. सध्याच्या आंतरराष्ट्रीय कायद्याचे लक्ष्य हे मुख्यत्वेकरून देशादेशांमधील नागरीक हेच होय. यामुळेच आंतरराष्ट्रीय कायदा हा राष्ट्रीय कायद्याप्रमाणेच नागरी समुहाच्या रेटयावर अवलंवून आहे, ही वाव लक्षात ठेवून आपण या वावतची आपली उदासीनता झटकून टाकणे अत्यावश्यक आहे.